प्रेसनोट दिनांक ०२/११/२०१८

**दुय्यम निबंधक कार्यालय बिलोली, येथील दुय्यम निबंधक सौ. माधवी बाळासाहेब पानसे व खाजगी इसम दस्तलेखक हनमंत मारोतराव शिवपनोर (पाटील) यांनी ७,५००/—रु. लाच स्विकारल्यानंतर नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.**

यातील तक्रारदार यांनी दिनांक ०१/११/२०१८ रोजी कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलूपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, " त्यांनी खरेदी केलेल्या शेत जमीनीचा दस्त नोदणी करण्यासाठी शेत जमीन विक्रीकरणार यांचे पॅनकार्ड नसतांना ॲड्जेस करून रजिस्ट्री करून दिली म्हणुन दुय्यम निबंधक बिलोली पानसे मॅडम व हनमंत पाटील हे ६,०००/—रू. ची लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली".

सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज दिनांक ०२/११/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन उप दुय्यम निबंधक कार्यालय बिलोली, परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये खाजगी इसम दस्तलेखक हनमंत पाटील, यांनी तक्रारदार यांना दिनांक १७/१०/२०१८ रोजी शत जमीन विक्रीकरणा यांचे पॅनकार्ड नसतांना ॲडजेस करून शेत जमीनीचा दस्त नोदणी करून दिल्याचा मोबदला म्हणुन बक्षीस स्वरूपात तक्रारदार यांचेकडे ८,०००/— रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ७,५००/—रू.लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. व दुय्यम निबंधक पानसे मॅडम हयांनी तक्रारदारास खाजगी इसम हनमंत पाटील यांना लाच देण्यास प्रोत्साहित केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ०२/११/२०१८ रोजी उप दुय्यम निबंधक कार्यालय बिलोली, परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये खाजगी इसम हनमंत पाटील यांनी तक्रारदार यांचे नमुद कामासाठी पंचा समक्ष ७,५००/—रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले व दुय्यम निबंधक पानसे मॅडम हयांनी त्यांचा पदाचा दुरूपयोग करून हनमंत पाटील यांना लाच स्विकारण्यास प्रोत्साहित करून सहाय्य केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन बिलोली.ता.बिलोली,येथे आरोपी लोकसेविका सौ.माधवी बाळासाहेब पानसे, वय ५० वर्ष, व्यवसाय नोकरी दुय्यम निबंधक, नेमणुक दुय्यम निबंधक कार्यालय बिलोली, ता.बिलोली राहणार आर्शीवादनगर नांदेड व खाजगी इसम आरोपी हनमंत मारोतराव शिवपनोर (पाटील), वय ५० वर्ष, यांचे विरुध्द कलम ७ (A), १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम(संशोधन)२०१८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२—२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net

Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

कार्यालय,पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड,युनिट

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.